# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

## <u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील निर्लेखित केलेली वाहने लिलावात काढण्याकरिता व्यावसायिक लिलावदार नियुक्त करण्याबाबत.</u>

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या मालकीच्या चार वाहनांची जाहिर लिलावाद्वारे विक्री करावयाची आहे. याकरिता शासन मान्य लिलावदारांची नियुक्ती करण्याकरिता दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

त्यानुसार इच्छुक लिलावदारांनी आपली माहिती, नाव, पत्रव्यवहाराचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक, शासनमान्य लिलावदार असल्याबाबतचे प्रमाणपत्र, शासनाच्या मालकीची निकामी वाहने लिलावात काढण्याच्या क्षेत्रातील आपला अनुभव व वाहनांच्या विक्रीच्या किंमतीपोटी येणाऱ्या रकमेवर आपणाकडून आकारला जाणाऱ्या मोबदल्याची रक्कम याबाबतची माहिती सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई-४०० ०३२ या पत्त्यावर दिनांक ४ फेब्रुवारी, २०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पाठवावे, ही विनंती.

दरपत्रक स्वीकृत झाल्यास त्यानुसार आपणास कळविण्यात येईल. मात्र कोणतेही दरपत्रक स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे. कृपया यांची नोंद घ्यावी, ही विनंती.

**सचिव-४,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
**विधान भवन, मुंबई.**